नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४४ Issue - 344 | वार गुरुवार दि. ७ मे २०२६ Blow- Thursday Date 7 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


# अमेरिका-इराण युद्ध थांबणार!

## १ पानी मेमोवर सहमती; होर्मुझवर संकटावर आनंदाची बातमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन: अमेरिका आणि इराण दशकभरातील सर्वात मोठ्या कराराजवळ पोहोचले आहेत. अमेरिकेच्या दोन अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं एक्सियोजनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. इराण विरुद्धचं युद्ध संपवण्यासाठी आणि अधिक सविस्तर अणु चर्चा करण्यासाठी एक रुपरेखा करण्याच्या हेतूनं एक पानी सामंजस्य करारावर जवळपास एकमत झालं आहे.

पुढील ४८ तासांत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवरील इराणचं उत्तर मिळेल, अशी आशा व्हाईट हाऊसच्या अधिकाऱ्यांना आहे. अद्यापपर्यंत तरी सहमती घडून आलेली नाही. पण युद्ध सुरु झाल्यापासून दोन्ही देश करार करण्याच्या इतक्या निकट पहिल्यांदाच आले आहेत. २८ फेब्रुवारीपासून इराण आणि अमेरिका यांच्यात संघर्ष सुरु आहे. या कालावधीत खनिज तेलाच्या किमती आभाळाला भिडल्या. खनिज तेलाचे दर प्रति बॅरल



१०० डॉलरच्या पुढे गेल्या.

एक्सियोजनं दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही देशांनी १४ मुद्दे असलेला एका नव्या कराराचा मसुदा तयार केला आहे. युद्ध संपवण्याचा आणि अण्वस्त्रासंदर्भात संवादाचा मार्ग जवळपास निश्चित झाला आहे. प्रस्तावित करारात इराण अणु संवर्धन थांबवेल, हा मुद्दादेखील आहे. त्या बदल्यात अमेरिका इराणवरील निर्बंध मागे घेईल. इराणच्या गोठवण्यात आलेल्या मालमत्ता मुक्त केल्या जातील. याचा इराणला आर्थिक फायदा होईल.

होर्मुझमधून होणारी वाहतूक विस्कळीत झाल्यानं जागतिक बाजारात खनिज तेलाचे दर आभाळाला भिडले. इराणनं होर्मुझ मधून होणारी वाहतूक रोखून धरल्यानं तेल निर्यातदार आणि तेल आयातदार देश अडचणीत आले. इराण आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित करार पाहता होर्मुझ संकट संपण्याची चिन्हं आहेत. इराण आणि अमेरिका होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांवरील निर्बंध हटवतील, असा उल्लेख प्रस्तावित करारात आहे. मात्र या अटी, शर्तींचं स्वरुप अंतिम करारवर अवलंबून असेल.

इराणचं नेतृत्त्व करणाऱ्या पथकात मतभेद आहेत. त्यामुळे सहमती होण्याची शक्यता धूसर असल्याचं व्हाईट हाऊसच्या अधिकाऱ्यांना वाटतं. इराण पुढील ४८ तासांच्या आत शस्त्रसंधीला सहमती दर्शवू शकतो. कराराच्या मसुद्यानुसार, इराण अणु करार काही वर्षांसाठी थांबवेल. त्याच्या बदल्यात अमेरिका हळूहळू निर्बंध कमी करेल. इराणच्या गोठवण्यात आलेल्या संपत्ती, मालमत्ता मुक्त केल्या जातील. अमेरिका टप्प्याटप्प्यानं इराण-वरील निर्बंध हटवेल.



# तमिळनाडूत महाराष्ट्र पॅटर्न? विजयला रोखण्यासाठी २ कट्टर विरोधी पक्ष आघाडी करण्याच्या तयारीत

चेन्नई: तामिळनाडूच्या राजकारणात वेगवान घडामोडी सुरु झाल्या आहेत. पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढवून थेट १०८ जागा मिळवणाऱ्या विजय यांच्या टीव्हीके पक्षाला सत्तेपासून दूर राखण्यासाठी घडामोडींना वेग आला आहे. त्यासाठी द्रमुक आणि अण्णाद्रमुक हे एकमेकांचे कट्टर विरोधक एकत्र येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडी उदयास आली होती. सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या भाजपला सत्तेपासून दूर राखण्यासाठी शिवसेनेनं काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सोबत हातंमिळवणी केली होती. तसाच काहीसा प्रयोग तमिळनाडूमध्येही होण्याची शक्यता दिसू लागली आहे.



टीव्हीकेचे प्रमुख विजय यांनी लोकभवनात जाऊन राज्यपालांची भेट घेतली. विजय यांनी सरकार स्थापनेचा दावा केला होता. त्यांनी राज्यपालांकडे ११२ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र दिलं. त्यावर राज्यपालांनी ११८ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र मागितलं. यानंतर विजय यांनी राज्यपालांकडे यासाठी वेळ मागितला. विजय यांच्या टीव्हीके पक्षाला १०८ जागांवर यश मिळालं असून बहुमतासाठी ११८ चा आकडा गाठणं महत्त्वाचं आहे.

२ जागा जिंकणाऱ्या व्हीसीकेनं द्रमुक सोबत आघाडी करुन विधानसभा निवडणूक लढवली होती. टीव्हीकेला सत्ता स्थापनेसाठी मोजक्याच आमदारांचा पाठिंबा कमी पडत असल्यानं व्हीसीके विजय यांच्या पक्षासोबत जाईल, अशी अटकळ होती. सत्ता स्थापनेच्या संघर्षात कोणासोबत जायचं यासाठी व्हीसीकेची बैठक होणार होती. मात्र द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांची युती होण्याची शक्यता असल्यानं व्हीसीकेनं बैठक रद्द केली. त्याआधी टीव्हीकेच्या निमंत्रणानंतरही डावे पक्ष आणि इंडियन युनियन मुस्लिम लीगनं त्यांना पाठिंबा देण्यास नकार दिला.

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत टीव्हीकेला १०८ जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी ११८ आमदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. विजय २ मतदारसंघातून विजयी झाले आहेत. त्यांना एका मतदारसंघाची आमदारकी सोडावी लागेल. त्यानंतर विजय यांच्याकडे १०७ आमदार असतील. अशा स्थितीत पक्षाला बहुमतासाठी ११ आमदारांचा पाठिंबा आवश्यक असेल. काँग्रेसनं टीव्हीकेला सशर्त पाठिंबा दिला आहे. काँग्रेसचे ५ आमदार निवडून आले आहेत. काँग्रेसनं द्रमुक सोबत आघाडी करुन निवडणूक लढवली होती.

विधानसभा निवडणुकीत द्रमुकला ५९, तर अण्णाद्रमुकला ४७ जागा मिळाल्या आहेत. दोघांचं एकत्रित संख्याबळ १०६ च्या घरात जातं. अशा परिस्थितीत या आघाडीला १२ आमदारांचा पाठिंबा आवश्यक असेल. या स्थितीत द्रमुक आणि अण्णाद्रमुकला अन्य पक्षांचा पाठिंबा गरजेचा असेल.

# तूर व हरभरा खरेदीला मुदतवाढ; राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून केंद्र शासनाने खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर व हरभरा खरेदीसाठी मुदतवाढ दिली आहे. तसेच हरभरा खरेदीत आणखी ५८ हजार ६३२ मेट्रिक टन वाढ केली असून आता राज्यात ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन हरभरा खरेदी करता येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्य शासनाच्या मागणीनुसार तूर खरेदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत तर हरभरा खरेदीची मुदत २९ मे २०२६ पर्यंत वाढवून दिली आहे. तसेच हरभरा खरेदीत ५८ हजार ६३२ मेट्रिक टन उद्दिष्ट वाढवून दिले, याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आभार मानले.

मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, सुरुवातीला केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेअंतर्गत तूर खरेदीसाठी ९० दिवसांचा तर हरभरा खरेदीसाठी ६० दिवसांचा कालावधी मंजूर करण्यात आला होता. मात्र राज्यातील शेतकऱ्यांकडून मुदतवाढीची सातत्याने मागणी होत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पणन विभागाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून अतिरिक्त मुदतवाढ मिळवून दिली. किमान हमीभाव योजनेअंतर्गत तूर खरेदीला १ फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात झाली असून, १ मेपर्यंतचा कालावधी आता ३१ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. खरीप हंगाम २०२५-२६ साठी राज्याला ३ लाख ३७ हजार मेट्रिक टन तूर खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ३७ हजार ८०१ शेतकऱ्यांकडून ६ लाख ८२ हजार ३७ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे.

हरभरा खरेदीला १ मार्च २०२६ पासून सुरुवात झाली होती. आधी २९ एप्रिलपर्यंत असलेली मुदत आता २९ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. हरभरा खरेदीसाठी सुरुवातीला ७ लाख ६१ हजार २५० मेट्रिक टन उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यात आणखी ५८ हजार ६३२ मेट्रिक टन वाढ करून एकूण उद्दिष्ट ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन करण्यात आले आहे. आतापर्यंत ३ लाख ७ हजार ९७३ शेतकऱ्यांकडून ७६ लाख १२ हजार ४९९ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे,अशी माहिती पणन मंत्री रावल यांनी दिली.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने तूर व हरभरा खरेदीसाठी नवीन तसेच एकदा वापरलेल्या लहान इ-ढुळश्रश्र ज्यूट पिशव्यांच्या वापरासही परवानगी दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी’ उपक्रमाला शासनाची मान्यता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी’ उपक्रमाअंतर्गत राज्यातील विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना इस्रो आणि अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. यासाठी ३.३० कोटी रुपये खर्च होणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमशीलतेला प्रोत्साहन देऊन त्यांना भविष्यासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी’ हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील प्रगत संशोधन संस्थांचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून, त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना मिळून भविष्यातील संशोधक घडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाबाबत आवड निर्माण व्हावी, तसेच अनुभवाधारित शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

या उपक्रमांतर्गत राज्यातील विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विज्ञान केंद्रांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणाऱ्या एकूण २१४८ विद्यार्थ्यांना जवळच्या विज्ञान केंद्रांना भेट देण्याचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इस्रो केंद्राला भेट देण्याचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता सहावी ते आठवी) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता नववी ते १२ वी) च्या विद्यार्थी गटाकरिता राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट ठरलेल्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची विशेष संधी देण्यात येणार असून, या दौऱ्यासाठी सुमारे ३.३० कोटी रुपयांच्या खर्चास शासनाने मान्यता दिली आहे.


उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात येणार असून, संबंधित स्तरांवरील अधिकाऱ्यांवर नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या उपक्रमासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समिती तसेच राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

**गरज भासल्यास आणखी केंद्रीय दलांची मदत घेतली जाणार**

# पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीनंतर हिंसाचार उसळला; निवडणूक आयोगाचा कडक इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी हिंसाचार आणि तोडफोडीच्या घटना घडत असल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. या पार्श्वभूमीवर आता भारत निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेत संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हिंसाचारात सहभागी असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही आणि दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.



दरम्यान, कोलकात्यातील न्यूटाउन परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने वातावरण आणखी चिघळले आहे. भाजप कार्यकर्ता मधु मंडल यांची मारहाण करून हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि मृताच्या कुटुंबीयांनी संताप व्यक्त करत जोरदार निषेध आंदोलन केले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला, ज्यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

राज्यातील विविध जिल्ह्यांमधून हिंसाचार, जाळपोळ आणि तोडफोडीच्या तक्रारी सतत येत असल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. निवडणूक आयोगाने राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, कोलकाता पोलीस आयुक्त तसेच केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांचे महासंचालक यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

याशिवाय, सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना सतत गस्त घालण्याचे आणि संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येत असून, गरज भासल्यास आणखी केंद्रीय दलांची मदत घेतली जाणार आहे.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, निवडणुकीनंतर होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराविरुद्ध ‘शून्य सहनशीलता’ धोरण राबवले जाईल. लोकशाही प्रक्रियेनंतर अशा प्रकारच्या घटनांना कोणतीही जागा नसल्याचेही आयोगाने ठामपणे नमूद केले आहे.

## संपादकीय....

### संघर्ष संपणार...

अमेरिका आणि इराण दशकभरातील सर्वात मोठ्या कराराजवळ पोहोचले आहेत. अमेरिकेच्या दोन अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं एक्सियोजनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. इराण विरुद्धचं युद्ध संपवण्यासाठी आणि अधिक सविस्तर अणु चर्चा करण्यासाठी एक रुपरेखा करण्याच्या हेतूनं एक पानी सामंजस्य करारावर जवळपास एकमत झालं आहे. पुढील ४८ तासांत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवरील इराणचं उत्तर मिळेल, अशी आशा व्हाईट हाऊसच्या अधिकाऱ्यांना आहे. अद्यापपर्यंत तरी सहमती घडून आलेली नाही. पण युद्ध सुरु झाल्यापासून दोन्ही देश करार करण्याच्या इतक्या निकट पहिल्यांदाच आले आहेत. २८ फेब्रुवारीपासून इराण आणि अमेरिका यांच्यात संघर्ष सुरु आहे. या कालावधीत खनिज तेलाच्या किमती आभाळाला भिडल्या. खनिज तेलाचे दर प्रति बॅरल १०० डॉलरच्या पुढे गेल्या. दोन्ही देशांनी १४ मुद्दे असलेला एका नव्या कराराचा मसुदा तयार केला आहे. युद्ध संपवण्याचा आणि अण्वस्त्रासंदर्भात संवादाचा मार्ग जवळपास निश्चित झाला आहे. प्रस्तावित करारात इराण अणु संवर्धन थांबवेल, हा मुद्दादेखील आहे. त्या बदल्यात अमेरिका इराणवरील निर्बंध मागे घेईल. इराणच्या गोठवण्यात आलेल्या मालमत्ता मुक्त केल्या जातील. याचा इराणला आर्थिक फायदा होईल. होर्मुझमधून होणारी वाहतूक विस्कळीत झाल्यानं जागतिक बाजारात खनिज तेलाचे दर आभाळाला भिडले. इराणनं होर्मुझ मधून होणारी वाहतूक रोखून धरल्यानं तेल निर्यातदार आणि तेल आयातदार देश अडचणीत आले. इराण आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित करार पाहता होर्मुझ संकट संपण्याची चिन्हं आहेत. इराण आणि अमेरिका होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांवरील निर्बंध हटवतील, असा उल्लेख प्रस्तावित करारात आहे. मात्र या अटी, शर्तींचं स्वरुप अंतिम करारवर अवलंबून असेल.

# स्वेरी फार्मसीमध्ये विख्यात अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते आधुनिक लॅबचे उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये क्लीनोव्हेट सॉफ्टवेअर प्रा. लि. या कंपनीचे आधुनिक सॉफ्टवेअर समाविष्ट असलेल्या लॅबचे उदघाटन भारताचे विख्यात अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मनियार यांच्या नेतृत्वाखाली ही अत्याधुनिक लॅब तयार करण्यात आली आहे. विशेषतः अमेरिका-युके (युएस-युके) हेल्थकेअर सिस्टीममध्ये एआय इंटिग्रेशन आधारित आधुनिक सॉफ्टवेअर समाविष्ट करण्याच्या उद्देशाने या लॅबची निर्मिती करण्यात आली आहे. स्वेरीच्या या शैक्षणिक उपक्रमाला 'एन्क्युटी टेक्नोलॉजीज' आणि 'एनक्युब फार्मा' यांचे प्रायोजकत्व लाभले आहे. अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी या लॅबची संपूर्ण पाहणी करून, माहिती जाणून घेतली. 'स्वेरीची गरुड भरारी' पाहता भविष्यात विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी उंचावेल.' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या लॅब साठी सुमारे २२ लाख रुपये इतकी गुंतवणूक करण्यात आली आहे. या लॅब च्या माध्यमातून फार्मसीमधील विद्यार्थ्यांना आधुनिक सॉफ्टवेअर प्रशिक्षण देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या लॅबमध्ये ओरॅकल अरगस क्लीनोव्हेट' हे सॉफ्टवेअर समाविष्ट करण्यात आले आहे. या लॅबच्या माध्यमातून फार्मसीच्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी विशेष प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. फार्मसी क्षेत्रात सॉफ्टवेअरच्या माध्यमातून काम करण्याच्या नवीन संधी अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. फार्माकोव्हिजिलन्स, मेडिकल




कोडिंग अशा विविध डोमेनमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थी जे सॉफ्टवेअर मधून शिक्षण घेत आहेत, त्याचाच प्रत्यक्ष वापर करून त्यांना प्रशिक्षणादरम्यानच कार्यानुभव मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सॉफ्ट स्किल्समध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना उत्तम व भरघोस पॅकेजच्या नोकरीच्या संधी मिळण्याची शक्यता वाढली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना ग्लोबल सर्टिफिकेशन, नोकरीसंदर्भात मार्गदर्शन तसेच विविध संशोधन प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आजपर्यंत एन्क्युटी टेक्नोलॉजीज्ने जवळपास दहा हजार हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. याचा स्वेरीतील विद्यार्थ्यांना भविष्यात फायदा होणार असून ग्लोबल सर्टिफिकेशन, संशोधन प्रकल्प, व्यवसाय, नोकरी, प्लेसमेंट आदी बाबतीत करिअर करण्यासाठी मदत मिळणार आहे. एन्क्युटी टेक्नोलॉजीज्च्या सीएसआरचे प्रमुख व महाविद्यालय समन्वयक शार्दुल भोसले, एन्क्युटी टेक्नोलॉजीज्च्या लीड टेक्निकल विभागाचे स्वप्निल कांबळे यांचे या लॅबसाठी सहकार्य लाभत आहे. या कार्यक्रमास सौ. सुयशा काकोडकर, डॉ. जान्हवी गांगल, स्वेरी या संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, विश्वस्त डॉ. सुरज रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे प्रा. कोमल परचंडे, तसेच श्री एन्क्युटी टेक्नोलॉजीज्चे प्रतिनिधी शार्दूल भोसले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धेत भिवंडीचा झेंडा; अद्वैत जाधव 'सामनावीर



**'अंतिम सामन्यात ३ बळींसह ६७ धावांची दमदार खेळी; ५००० खेळाडूंमधून चमकला पडघ्याचा युवा क्रिकेटपटू**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबईतील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मुंबई क्रिकेट असोसिएशन आयोजित १२ वर्षांखालील 'टॅलेंट हंट' लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील समतानगर, पडघा येथील अद्वैत अमोल जाधव याने उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सामन्यात 'सामनावीर' (चरप ेष ींहश चरींलह) पुरस्कार पटकावला आहे. कांदिवली येथील सचिन तेंडुलकर जिमखाना मैदानावर ही स्पर्धा पार पडली. अद्वैत जाधवने संपूर्ण स्पर्धेत प्रभावी अष्टपैलू कामगिरी करत तीन सामन्यांत एकूण ९ फलंदाज बाद केले आणि १२० धावा जमविल्या. विशेषतः अंतिम सामन्यात त्याने ३ विकेट्स घेत ६७ धावांची सामना-विजयी खेळी साकारत आपल्या संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. त्याच्या या भक्कम प्रदर्शनामुळे त्याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी त्याला मेडल तसेच वानखेडे स्टेडियम येथे होणाऱ्या आयपीएल सामन्याचे तिकीट देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेसाठी मुंबई शहर व ग्रामीण भागातून तब्बल ५००० खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात आली होती. पहिल्या फेरीत २३०, तर दुसऱ्या फेरीत १२० खेळाडूंची निवड करण्यात आली. त्यातून ८ संघांची निर्मिती करण्यात आली होती. या स्पर्धेत अद्वैतची 'ई' संघात निवड झाली होती. लीग सामन्यांमध्येही त्याने सातत्यपूर्ण कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले.



ग्रामीण भागातून आलेल्या अद्वैत जाधवने आपल्या खेळाच्या जोरावर शहरी स्पर्धेत ठसा उमटवत भिवंडी तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्याच्या या यशामागे भिवंडी तालुका क्रिकेट असोसिएशन व मुंबई क्रिकेट असोसिएशनशी संलग्न प्रशिक्षक हुसेन सरगुरू, उमरहुसेन सरगुरू, अजय जयस्वाल आणि कृष्णा केशरवाणी यांचे मार्गदर्शन लाभले.

अद्वैतच्या या उल्लेखनीय यशाबद्दल टी. ए. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, पडघा, लोकधारा प्रतिष्ठान, समाज विकास मंडळ समतानगर तसेच संयुक्त जयंती महोत्सव कमिटी, पडघा विभाग यांच्यासह विविध स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बुद्धपौर्णिमे निमित्त अमर ज्योती भंतेजींच्या उपस्थितीत दुधनी भीम संघर्ष मार्ग तर्फे सामुहीक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : तथागत गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंती निमित्त भीम संघर्ष मार्ग वतीने पूज्य अमर ज्योती भंतेजी यांच्या उपस्थितीत भीम नगर दुधनी येथे गौतम बुद्ध यांच्या मूर्तीसह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व सर्व महापुरुष यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून गुलाबर्गाचे भन्ते अमर ज्योती भेळमगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अप्पू परमाशेट्टी प्रगतीशील शेतकरी शंकर भांजी असोसिएशन समितीचे अध्यक्ष बसवराज परमशेट्टी नगरपरिषद कर्मचारी गुरु मगी पोलीस अंमलदार माने साहेब चान्नू भांजी सत्यजिय करिअयर आकडेमी चे लक्ष्मण राठोड रिपई (आठवले)चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, निंगप्पा निंबाळकर पिंटू लोड्डेन शिवा गायकवाड भीम संघर्ष मार्गचा संस्थापक सचिन लोड्डेन, धर्म शिंगे, गुरु धोडमनी, सुरेश शिंगे, चंद्रकांत गायकवाड, जयभिम बळुंडगी, शांतू जन्ना, शंकर निंबाळ,लक्ष्मण लोड्डे, संतोष जन्ना, महेंद्र लोड्डे, लक्ष्मण रेवूरे, सुरेश बसवनकेरी, भीमा झळकी, विश्व मगी व भीम संघर्ष मार्ग ग्रुपचे सर्व पदाधीकारी कार्याकर्ते, भिमनगर येथील नागरीक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे प्रेरणादायी व्याख्यान; विद्यार्थी मंत्रमुग्ध

# शिवाजी महाराजांचे नेतृत्व व डॉ. आंबेडकरांचे विचार तरुणांसाठी दिशादर्शक : प्रा. डॉ. किशोर थोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आजच्या तरुण पिढीसाठी आदर्श जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरे प्रेरणास्त्रोत असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. किशोर थोरे यांनी केले. ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे आयोजित प्रेरणादायी व्याख्यानात ते बोलत होते. त्यांच्या विचारप्रवर्तक भाषणाने उपस्थित विद्यार्थी व पालक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.

आपल्या भाषणात प्रा. डॉ. थोरे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते अत्यंत दूरदृष्टी असलेले जाणते राजे होते. अनेक संकटांचा सामना करत त्यांनी स्वराज्याची स्थापना केली आणि त्यानंतर सुराज्य घडवण्यासाठीही अथक प्रयत्न केले. त्यांच्या मुत्सद्दीपणाचे उत्तम उदाहरण म्हणजे पुरंदरचा तह होय. संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर स्वराज्याचे अस्तित्व टिकवून ठेवले. शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांचा दाखला देत त्यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व, धैर्य आणि निर्णयक्षमता यांचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी त्यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवरही सविस्तर भाष्य केले. आजची तरुण पिढी पुस्तकांपासून दूर जात असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी वाचनसंस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. डॉ. आंबेडकरांनी कामगार, महिला व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य अत्यंत मोलाचे असून त्यांची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. 'हिंदू कोड बिल'च्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत, ते विधेयक फेटाळले गेल्यानंतर त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला, ही त्यांची तत्त्वनिष्ठा तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच, भारतीय राज्यघटनेमुळेच आज ७५ वर्षांनंतरही भारत एकसंध व मजबूत राष्ट्र म्हणून उभा असल्याचे त्यांनी





स्पष्ट केले. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वामुळे कार्यक्रमातील वातावरण प्रेरणादायी झाले.

कार्यक्रमाला कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, संगणक विभाग प्रमुख प्रा. एस. व्ही. कुलकर्णी, ईएनटीसी विभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. एस. बी. गडवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. आरती वळसंग यांनी केले.

# सारनाथ बुद्ध विहारात भगवान बुद्धांची मूर्ती स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : लातूर येथील अवंती नगर भागात युवा भिम सेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे यांच्या निवासस्थानाजवळ सारनाथ बुद्ध विहाराची स्थापना करण्यात आली होती.परंन्तू या विहारात साधी मुर्ती होती.सध्या पंचधातूची मुर्ती पुज्य भंते पयानंद थेरो यांच्या हस्ते विधिवत भगवान गौतम बुद्धांच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली.हे विहार महिलांच्या आर्थिक परिश्रमातून साकारलेले असुन यात महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला असुन यात प्रामुख्याने प्रतिभा पंकज काटे, पुष्पाताई मस्के, माया धावारे, जयश्रीताई कांबळे,सत्यशिला सोमवंशी, कांताबाई काकडे,हिरकनाबाई कांबळे,काशिबाई कांबळे,पद्मिनबाई कांबळे, पार्वती माने,रेखा सुरवसे, निर्मला



आपटे, किन्नीकरताई, शकुंतला कांबळे, सुरेखा ओव्हाळ, प्रतिभा कांबळे,अनिता सोनवणे, संध्या आडसुळ, गंभीरे ताई, रेणुका गायकवाड, ईत्यादि महिला भगिनी उपस्थित होत्या, कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रियंकाताई विश्वजीत गायकवाड, पांडुरंग आंबुलगेकर सर, लातूर शहर महापौर जयश्री सोनकांबळे, उपस्थित होते यावेळी युवा भिम सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुफी सय्यद शमशोद्दीन युवा भिम सेनेचे प्रवक्ते यांनी केले तर प्रास्ताविक शाहीर जगताप यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पात्रता नसताना मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांवर टीका करणाऱ्या प्रणिती शिंदे यांच्या बुद्धीची कीव येते

## आमदार देवेंद्र कोठे यांची खासदार प्रणिती शिंदे यांना जोरदार चपराक : संस्कृत वडिलांचा आदर्श घेण्याचाही सल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : खासदार असूनही वर्षातून दर तीन महिन्यांनी सोलापूरला येणाऱ्या आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी पात्रता नसतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोलून टीआरपी मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या खा. प्रणिती शिंदे यांच्या बुद्धीची कीव येते अशी जोरदार राजकीय चपराक आमदार देवेंद्र कोठे यांनी खा. प्रणिती शिंदे यांना लगावली.

नसरापूर येथील प्रकरणाबाबत खा. प्रणिती शिंदे यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याची मागणी केल्यानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी आमदार देवेंद्र कोठे यांना प्रतिक्रिया विचारली असता आ. देवेंद्र कोठे यांनी खा. प्रणिती शिंदे यांच्यावर सडकून टीका केली.

आ. देवेंद्र कोठे म्हणाले, नसरापूर येथील चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपीला कठोर शिक्षा देणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर आरोपींना कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित शिक्षा मिळवून दिल्याची कित्येक उदाहरणे आहेत. असे असताना खा. प्रणिती शिंदे मात्र प्रसिद्धीसाठी धडपड करत आहेत. प्रसारमाध्यमांचे कॅमेरे, बूम दिसल्यानंतर त्यांना प्रसिद्धी मिळविल्याशिवाय रहावत नाही, असेही आ. देवेंद्र कोठे म्हणाले.

### खा. प्रणिती शिंदे यांना सकल हिंदू समाजाची एलर्जी

**नसरापूर येथील पीडित कुटुंबाबद्दल खासदार प्रणिती शिंदे यांना खरोखरच सहानुभूती असती तर त्यांनी काँग्रेस भवनपासून अवघ्या काही अंतरावर सुरू असलेल्या सकल हिंदू समाजाच्या निषेध आंदोलनात सहभागी व्हायला हवे होते. परंतु खा. प्रणिती शिंदे यांना सकल हिंदू समाजाची एलर्जी असल्यामुळे त्यांनी तेथे जाण्याचे जाणीवपूर्वक टाळले, असेही आमदार देवेंद्र कोठे म्हणाले.**

### सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जपण्याचा सल्ला

**माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या रूपाने खा. शिंदे यांच्या घरात सुसंस्कृत राजकारणाचा वारसा आहे. सुशीलकुमार शिंदे यांचे सर्व पक्षांशी घनिष्ठ संबंध आहेत. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात सुशीलकुमार शिंदे यांनी अमेरिकेत भारताचे नेतृत्व केले आहे. असे असताना खा. शिंदे मात्र नेमकी उलटी भूमिका घेत आहेत. खालच्या पातळीवरील टीका करत आहेत. खा. प्रणिती शिंदे यांनी राजकीय अनुभवानुसार बुद्धीतही वाढ करावी, असा सणसणीत टोलाही आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी लगावला.**

सुशीलकुमार शिंदे देखील अनेक वर्षे केंद्रीय गृहमंत्री होते. त्या काळातही अनेक अनिष्ट घटना देशभरात घडल्या. त्यावेळी आमदार असलेल्या प्रणिती शिंदे यांनी आपल्या वडिलांना किंवा संबंधित नेतृत्वाला राजीनामा मागितला का ? असा सवालही आ. कोठे यांनी उपस्थित केला.

खा. प्रणिती शिंदे यांना जनतेने खासदार म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे त्यांनी जनतेची कामे करावीत. विकासावरून राजकारण करू नये. एकीकडे निधी मिळत नाही अशी ओरड करायची आणि दुसरीकडे आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासारख्या भाजपाच्या आमदारांना भाजप सरकारकडून मिळालेल्या निधीचे श्रेय घ्यायचे असा प्रकार खा. शिंदे करत आहेत. मंजूर होणाऱ्या योजनांचे पत्र द्यायचे, नेत्यांसोबत फोटो काढायचे आणि ते काम मीच केले असे म्हणत श्रेय घेण्याची घाण सवय खासदार प्रणिती शिंदे यांना आहे. त्यांची बाजू जर खरीच सत्याची असती तर त्यांनी विमानसेवा, वंदे भारत रेल्वे सुरू झाल्यानंतर केंद्रीय मंत्र्यांना भेटून त्यांचे आभार मानले का ? असा प्रश्नही आ. देवेंद्र कोठे यांनी उपस्थित केला.



## राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने प्राचार्य अनिल देशमुख सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे एस. एस. शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अनिल देशमुख यांना एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सन्मान सोहळ्यात प्रा. डॉ. बापूसाहेब आडसुळ (सर), मुंबईचे नगरसेवक अंकुश कदम, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हैत्रे, जिल्हा प्रमुख मनीष काळजे, प्रकाश नांगरे, महेश चिवटे, मंगेश चिवटे यांच्या हस्ते देशमुख यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे सचिव श्रीशैल पाटील यांच्यासह किलजे सर, कलशेट्टी सर, बिराजदार सर, व्ही. के. देशमुख सर, जाधव सर, बाळासाहेब कुळकर्णी सर, घुगरे सर, होटकर सर, मठपती सर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य अनिल देशमुख यांच्या शैक्षणिक नेतृत्वामुळे संस्थेचा शैक्षणिक दर्जा उंचावला असून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, शिस्त व नैतिक मूल्ये रुजविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला.



या सन्मानाबद्दल शिक्षण क्षेत्रातून व विविध स्तरांवरून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळाकडून सोलापूर जिल्हा परिषद नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद अध्यक्ष उपाध्यक्ष आणि सदस्यांचा सत्कार समारंभ उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र नाभिक महामंडळ अक्कलकोट शहर व तालुका कळवण सोलापूर जिल्हा परिषद नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कुशल जैन, जिल्हा परिषद नूतन अध्यक्ष श्री दीपक वैद्य, नूतन उपाध्यक्ष श्री इंद्रजीत पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री आनंद तानवडे नूतन जिल्हा परिषद वागदारी गटाचे सदस्य श्री प्रवीण तानवडे जिल्हा परिषद करकम गटाचे नूतन सदस्य श्री आदिनाथ देशमुख शिरवळ पंचायत समिती घनाचे प्रथम सदस्य श्री गणेश मोरे यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून जिल्हा परिषद शैक्षणिक मधून ग्रामीण भागातील केस करताना दुकानासाठी व जपानी खुर्ची ची योजना चालू असणारे करण्यात यावी ही योजना दरवर्षी राबवावे यासाठी निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र नाभिक महामंडळ प्रदेश उपाध्यक्ष वैभव शेटे सर सोलापूर जिल्हा अध्यक्ष संजय चिखले उपाध्यक्ष प्रभाकर सुरवसे सचिव भगवती अक्कलकोट तालुका अध्यक्ष शिवशरण सुरवसे शहराध्यक्ष लक्ष्मण बापू काळे सामाजिक कार्यकर्ते शहाबुद्दीन शेख कुतुबुद्दीन शेख अक्कलकोट महिला तालुका अध्यक्ष अनुराधा सुरवसे, युती अध्यक्ष भाग्यश्री काळे, ग,णेश कोरे संजय, पंकज सुरवसे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने रोपळे येथे विशेष शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक ५/५/२०२६ रोजी भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने रोपळे तालुका पंढरपूर येथे रामोशी समाजासाठी विविध शासकीय दाखले देण्यासाठी विषय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिर भटके विमुक्त विकास परिषदेचे संघटन मंत्री राहुलजी चव्हाण व प्रदेशाध्यक्ष उद्धवजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले यासाठी सन्माननीय जिल्हाधिकारी कीर्ती केयन साहेब निवासी जिल्हाधिकारी अभिजीत पाटील महाराज बहुजन समाजाचे सोनटक्के पंढरपूरची तहसीलदार सचिन लंगोटे, विशेष कार्य सहकार्य लाभले.

या शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भटक्या विमुक्त विकास परिषदेचे जिल्हा शासकीय सदस्य व अभिमान प्रमुख सुनील पवार पंढरपूर तालुका सहयोग प्रशांत साप्लेकर सहसंयोजक सुवर्णाताई पवार मंडल अधिकारी बाळासाहेब कदम तालुका पुरवठा अधिकारी बादल साहेब आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष अंकुश जाधव दादा जाधव ओंकार जाधव परमेश्वर जाधव विवेक जाधव आजींचे सहकार्य लाभले आहे यावेळी १०४ लाभार्थ्यांना विविध प्रकारचे दाखले काढून देण्यात आली.

**रक्षा विसर्जनाच्या दिवशी मित्राला वाहिली एसटी बसच्या रूपाने खरी श्रद्धांजली!**

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवांनी पुर्ण केले सच्चा कार्यकर्ता स्व.शिवाजी कायंदे यांचे अखेरचे स्वप्न पूर्ण!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : स्व.शिवाजी कायंदे यांनी जनतेचे हाती घेतले काम.केवळ शब्द नव्हते, तर तो त्यांचा श्वास होता. कंडारी परिसरातील गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणारे व्यक्तिमत्व माजी सरपंच स्व. शिवाजी कायंदे. त्यांच्या अथक पाठपुराव्याला अखेर यश आले असून, मागील पाच वर्षांपासून बंद असलेली बस सेवा पुन्हा सुरू झाली आहे. मात्र, दुर्दैवाने ज्या दिवशी ही बस गावात आली, त्याच दिवशी त्यांचा रक्षा विसर्जनाचा कार्यक्रम सुरू होता. आपल्या लाडक्या नेत्याने शेवटच्या श्वासापर्यंत दिलेला लढा यशस्वी झाल्याचे पाहून संपूर्ण परिसर गहिवरून गेला.

शिवाजी कायंदे म्हणजे एक साधा भोळा आणि मनमिळाऊ चेहरा. कंडारी, भंडारी, जागदरी, खळेगाव, देऊळगाव कोळ, राजेगाव आणि शेंदुर्जन , दरेगाव . नागझरी. लिंगा. सायाळा.बाळसमुद्र अशा अनेक खेड्यापाड्यातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यात त्यांचा पुढाकार असायचा. मग तो शेतकऱ्यांच्या मोटार पंपाचा प्रश्न असो, स्प्रिंकलर, ट्रॅक्टर साहित्य असो वा महिलांच्या शिलाई मशीन आणि गॅस कनेक्शनचा प्रश्न; तसेच ज्येष्ठ मंडळींची पगार शिवाजी कायंदे यांनी घरोघरी जाऊन हे प्रश्न मार्गी लावले. गरिबीची जाण असलेल्या या नेत्याला एखादे काम पूर्ण झाले नाही तर चैन पडत नसे.

**✻पाच वर्षांचा वनवास संपला:✻**

शेंदुर्जन आणि परिसरातील मुलींना तसेच वयोवृद्धांना प्रवासासाठी खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. अव्वाच्या सव्वा पैसे देऊनही शालेय मुलींना वेळेवर शाळेत पोहोचणे अशक्य झाले होते. ही अडचण पाहून शिवाजी कायंदे यांनी ✻केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव✻ यांच्याकडे ही बस सेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी जोरदार आग्रह धरला होता. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी देखील या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून तातडीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बुलढाणा विभागाला पत्र दिले.

**महाराष्ट्र दिनाचे स्वप्न आणि दुर्दैवी शेवट:**

शिवाजी कायंदे यांची इच्छा होती की १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ही बस सुरू व्हावी. त्यासाठी त्यांनी चालक आणि वाहकाचा सत्कार करण्यासाठी शाल-श्रीफळही आणून ठेवले होते. परंतु, काही तांत्रिक अडचणींमुळे त्या दिवशी बस येऊ शकली नाही. पाठपुरावा सुरूच होता, पण नियतीला काही वेगळेच मान्य होते. ३ मे रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने कायंदे यांचे निधन झाले.

**खऱ्या अर्थाने श्रद्धांजली:**

आज ६ मे रोजी त्यांचा रक्षा विसर्जनाचा कार्यक्रम सुरू असतानाच कंडारीच्या बस स्टॉपवर एसटी बस येऊन धडकली. पाच वर्षांनंतर गावात आलेली 'लालपरी' पाहून ग्रामस्थांना



शिवाजी कायंदे यांच्या शब्दांची आठवण झाली. मरेंगे लेकिन पीछे नही हटेंगे म्हणणाऱ्या या नेत्याने मृत्यूनंतरही गावकऱ्यांची सोय करून आपले वचन पूर्ण केले, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

**रक्षा विसर्जनाच्या प्रसंगी**

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी आमदार शशिकांत खेडेकर, तसेच समस्त गावकरी मंडळी✻ यांच्यासह परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकारी,



अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या लाडक्या मित्राचे स्वप्न तातडीने पूर्ण करून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी शिवाजी कायंदे यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## चाटोरीत मजुरीसाठी आलेल्या दाम्पत्यांच्या तीन वर्षीय मुलीवर युवकाचा अत्याचार

**तीन दिवसांची पोलिस कोठडी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पुणे येथील बालिकेवरील अत्याचाराचे प्रकरणावरुन संतापाची लाट उसळत असतांना निफाड तालुक्यातील चाटोरी येथे देखील मजुरीसाठी आलेल्या तीन वर्षिय पिडितेवर एकोणावीस वर्षीय युवकाने अत्याचार केल्याची निंदणीय घटना घडली आहे.

निफाड तालुक्यातील चाटोरी शिवारात गेल्या महिनाभरापासुन रणखेडा जि जळगांव येथुन ऊस तोडणीसाठी आलेल्या मजुरासह कूटुंबही आलेले होते. त्याचवेळी तीन वर्षीय पिडितेचे वडील हे गावी गेलेले असल्याने पिडितेसह तिची आई व मुले चाटोरी शिवारात असतांना दि १ मे रोजी साय ४

पिडीतेला तहान लागल्याने पिडितेची आई पाणी आणण्यासाठी बाहेर गेल्यावर पिडीतेवर संशयित समीर भाऊसाहेब महाले (१९) अत्याचार केला पिडितेची आई पिडितेला पाणी घेऊन आली त्यावेळी तीने संशयित पिडितेवर कुकर्म करत असतांना पाहिले संशयिताने तेथुन पळ काढला



याबाबत सायखेडा पोलिस स्टेशनला पिडितेच्या आईचे फिर्यादीवरुन भारतीय न्याय संहिता ६५(२), बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा ४(२) ,७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संशयित समीर भाऊसाहेब महाले यास अटक करुन निफाडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता त्यास तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे गुन्ह्याचा तपास सपोनि संदीप घुगे करत आहेत.

# नळदुर्ग येथे निकृष्ट दर्जाच्या पाणी टाकीच्या पायऱ्या बनवणाऱ्या गुत्तेदाराला आली जाग

## कोसळलेल्या पाणी टाकीच्या पायऱ्या दुरुस्तीला वेग; पारदर्शकता नसेल तर कारवाई होणारच



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :

मानवाच्या व प्राणी जीवनातला अत्यावश्यक प्रश्न म्हणजे पाणी नळदुर्ग शहरामध्ये खूप तातडीची ४३ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे मानवाच्या जीवनातला अत्यावश्यक प्रश्न म्हणजे पाणी

नळदुर्ग शहरातल्या नागरिकांना पाणी प्रश्न खूप मोठ्या प्रमाणात भेडसावत असून नळदुर्ग नगरपालिकेच्या माध्यमातून चालू असलेल्या पिण्याच्या पाण्याची टाकी १ लाख ६५ लिटरची डॉ आंबेडकर नगर मध्ये तयार झाली असून त्याचे उर्वरित बांधकाम आणि प्लास्टर प्रलंबित आहे

एवढे असताना सुद्धा निकृष्ट दर्जाच्या १६ च् च् स्टीलचा सळईचा पायऱ्या बनविण्यासाठी वापर करित असून दोन्ही बाजू तोल सांभाळण्यासाठी अँगल सुद्धा लावलेले दिसून येत नाहीत मग नगरपालिका कर्मचाऱ्यांनी टाकी धुते वेळेस वर जायचं कसं कामे करायची कशी ही धोक्याची पातळी ओलांडल्या सारखी आहे या पिण्याच्या टाकी आणि

**इन्फेक्ट बातमीचा**

पायऱ्याचे काम धोकादायक असल्याचे नागरिकातून बोलले जात आहे

नळदुर्ग शहरातील निकृष्ट दर्जाच्या पाणी टाकीच्या पायऱ्या ची बातमी लागतात गुत्तेदारांची धावपळ सुरू झाली आणि ताबडतोब कोसळलेल्या पायऱ्यांच्या दुरुस्तीला तात्काळ सुरुवात करण्यात आली.

परंतु नळदुर्ग शहरातल्या प्रत्येक पाण्याच्या टाकीला सिमेंटच्या पायऱ्या केले जातात मग डॉ आंबेडकर मध्येच का लोखंडाच्या पायऱ्या का ? नागरिकात संताप व्यक्त केला जातोय डॉ आंबेडकर नगर मध्ये पाणी टाक्यावर चढणाऱ्या पायऱ्या केवळ या पायऱ्याला १६ एमएम चे बार लावले आहेत यामुळे ह्या पायऱ्या जनतेसाठी किंवा कर्मचाऱ्यांसाठी धोकादायक बनल्या आहेत

> **नळदुर्ग शहरातील विकासकामे करण्यासाठी आम्ही तत्पर असून निकृष्ट दर्जाच्या काम करणाऱ्या उत्तराला कदापी पाठीशी घालणार नाही शिवाय कामांमध्ये पारदर्शकता नसेल तर अशा गुत्तेदारावर तर कारवाई होणारच नळदुर्ग शहरातील जे ही विकास काम चालू आहे त्या विकास कामावर जनतेने सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे कारण जनतेची सुद्धा जबाबदारी आहे विकास कामे उत्कृष्ठ करून घेण्याची.**
>
> **– बसवराज धरणे**
> **नगराध्यक्ष न प नळदूर्ग**

## टिपू सुलतान सोशल फोंडेशन अक्कलकोटच्या वतीने खतना कॅम्प संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : शेर-ए-हिंद हजरत टिपु सुलतान यांच्या शहीद दिनानिमित्त टिपू सुलतान सोशल फोंडेशन अक्कलकोट यांच्यावतीने खतना कॅम्प शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात अक्कलकोट शहर व तालुक्यातील एकूण ४० मुलांची खतना करण्यात आली खतना करण्यासाठी तसेच गोळ्या औषध आणि ड्रेसिंगसाठी २५०० ते ३००० हजार रुपये खर्च येतो. हे लक्षात घेऊन टिपू सुलतान सोशल फाउंडेशनने खतना शिबिर घेण्यात आले यामुळे लोकांच्या पैशांची बचत झाली.

टिपू सुलतान सोशल फोंडेशनच्या सामाजिक उपक्रम खतना कॅम्प शिबिराला अक्कलकोट शहरातील नगरसेवक व बांधकाम सभापती सद्दाम शेरीकर, नगरसेवक नंदू कोरबू, नगरसेवक नावेद डांगे, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, रशीद खिस्तके, सैपन हगलदिवटे आदींनी भेट देऊन राबवण्यात आलेल्या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले व शुभेच्छा देण्यात आले.

मागील दोन-तीन वर्षांपासून फाउंडेशनतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

खतनासाठी सोलापूरचे प्रसिद्ध डॉक्टर नासीर सय्यद, मोबीन शेख,अल्लाउद्दीन कुरेशी,यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

खतना कॅम्प शिबिराचे आयोजन संस्थापक अध्यक्ष सैपन शेख व उपाध्यक्ष बाबा गोलंदाज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यामध्ये म.जी शेख, आसिफ पटेल,कलाम खान, साहिल शेख, बबलु शेख आणि फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

## निफाडला नरसापुर येथील निष्पाप मुलीवर झालेल्या अन्यायाचा सकल बहू भाषिक ब्राह्मण समाजा तर्फे जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नरसापुर पुणे येथे एका निष्पाप चिमुकल्या मुलीवर झालेल्या बलात्कार व तिचा निरखून खून करण्यात आला या घटनेचा निफाडला बहुभाषिक ब्राह्मण समाजातर्फे घाणेरड्या विचारसरणीचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.




निफाड पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन देण्यात आले या निवेदनात म्हटले आहे की समाजातील असे नराधम वेळीच आेळखून त्यांना कठोर शिक्षा होणे हे सशक्त समाजासाठी गरजेचे आहे नरसापुर पुणे येथील हा नराधम याची उदाहरण असून गुन्ह्यात असलेला आरोपी यांनी केलेला गुन्हा हा अत्यंत भीषण व समाजातील घटकाला हादरवून टाकणार आहे अशा आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळणे आवश्यक आहे महाराष्ट्र सरकार व पोलीस प्रशासन तसेच कायद्यावर आमचा विश्वास असून समाज म्हणून चिमुकल्या निष्पाप मुलीच्या व तिच्या कुटुंबीयांच्या पाठीमागे उभे राहणे आमची नैतिक व सामाजिक बांधिलकी आहे तरी आरोपीस कठोरातील कठोर शिक्षा व्हावी व निरागस निष्पाप मुलीला न्याय मिळावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आले आहे याप्रसंगी सकल बहुभाषिक ब्राह्मण समाज उपस्थित होता.

## उसाला एफ आर पी ३६५० रुपये मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ऊस उत्पादन करण्यासाठी वरचेवर खर्चामध्ये वाढ होत आहे व रासायनिक खताचे दर वाढल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यापुढे एफ आर पी मध्ये वाढ करण्यात यावी अशी शेतकऱ्यांकडून मागणी होत होती.

याची दखल घेऊन केंद्र सरकारने शंभर रुपयाची वाढ केली आहे. आता शेतकऱ्यांना तीन हजार सहाशे रुपये एफ आर पी प्रमाणे ऊस दर मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान होत आहे.


सनन २०२५ /२६ च्या गाळभागामध्ये शेतकऱ्यांना तीन हजार पाचशे पन्नास रुपये प्रमाणे एफ आर पी देण्यात आली होती. त्यामुळे एफ आर पी च्या दरामध्ये वाढ करण्यात यावी अशी शेतकऱ्याकडून मागणी होती.

नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली त्यामध्ये २०२६ २७ नुकत्याच होणाऱ्या गळीत हंगामाच्या उसाला दर तीन हजार ६५० रुपये एफ आर पी देण्याचा निर्णय घेण्यात आला. एफ आर पी मध्ये शंभर रुपयाची वाढ झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. एक आक्टोंबर पासून सुरु होणाऱ्या गाड्यात हंगामात हा नवीन दर लागू होत आहे.

## सारनाथ बुद्ध विहारात भगवान बुद्धांची मूर्ती स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : लातूर येथील अवंती नगर भागात युवा भिम सेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे यांच्या निवासस्थानाजवळ सारनाथ बुद्ध विहाराची स्थापना करण्यात आली होती.परंन्तू या विहारात साधी मुर्ती होती. सध्या पंचधातूची मुर्ती पुज्य भंते पयानंद थेरो यांच्या हस्ते विधिवत भगवान गौतम बुद्धांच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली.हे विहार महिलांच्या आर्थिक परिश्रमातून साकारलेले असुन यात महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला असुन यात प्रामुख्याने प्रतिभा पंकज काटे, पुष्पाताई मस्के, माया धावारे, जयश्रीताई कांबळे,सत्यशिला सोमवंशी, कांताबाई काकडे,हिरकनाबाई कांबळे,काशिबाई कांबळे,पद्मिनबाई कांबळे, पार्वती माने,रेखा सुरवसे, निर्मला आपटे, किन्नीकरताई, शकुंतला कांबळे, सुरेखा ओव्हाळ, प्रतिभा कांबळे,अनिता सोनवणे, संध्या आडसुळ, गंभीरे ताई, रेणुका गायकवाड, ईत्यादि महिला भगिनी उपस्थित होत्या, कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून



प्रियंकाताई विश्वजीत गायकवाड, पांडुरंग आंबुलगेकर सर, लातूर शहर महापौर जयश्री सोनकांबळे, उपस्थित होते यावेळी युवा भिम सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुफी सय्यद शमशोद्दीन युवा भिम सेनेचे प्रवक्ते यांनी केले तर प्रास्ताविक शाहीर जगताप यांनी केले.

## कळंब येथे 'राष्ट्रचिंतन अभियान' अंतर्गत महर्षी गज अरविंद यांचे व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : हिन्दराष्ट्र ऑर्गनायझेशनच्या वतीने 'राष्ट्रचिंतन अभियान' अंतर्गत विशेष चर्चा सत्राचे आयोजन गुरुवार, दि. ७ मे २०२६ रोजी करण्यात आले आहे.विद्याभवन हायस्कूल सभागृह, कळंब येथे दुपारी ४ ते ६ या वेळेत होणाऱ्या या सत्रात कृषी, आरोग्य व शिक्षण या महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन व चर्चा होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून महर्षी गज अरविंद उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ हे असतील. कळंब शहर व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा व चर्चा सत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन हिन्द राष्ट्र संघाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षा सौ. राधाताई सपकाळ यांनी केले आहे. तसेच या कार्यक्रमाची व्यवस्था माहिती व्यवस्थापक श्री अंकुश कसबे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवली आहे. तरी नागरिकांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे

### हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात 'मुंज' सोहळा; मान्यवरांची मांदियाळी

## कलदेव लिंबाळा येथे गुरव समाजाचा ऐतिहासिक सोहळा; २३६ बटूंचा सामूहिक उपनयन संस्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/ज्ञानेश्वर गुरव :

उमरगा तालुक्यातील कलदेव लिंबळा येथील पावन भूमीत गुरव समाज आयोजक कमिटीच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध आणि मंगलमय वातावरणात. २३६ बटूंचा सामूहिक उपनयन संस्कार (मुंज) सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुमारे ८ ते १० हजार समाजबांधवांच्या साक्षीने हा सोहळा संपन्न झाला, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

**संस्कारांचा मंगल जागर**

हिंदू धर्मातील सोळा संस्कारांपैकी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या सोहळ्यात बटूंना गायत्री मंत्राची दीक्षा देऊन 'द्विज'त्वाचा मान देण्यात आला. पहाटेपासूनच विधींना सुरुवात झाली. यामध्ये:

मातृभोजन: बटूंनी आपल्या मातेकडून प्रेमाने भिक्षा ग्रहण केली, ज्यामुळे उपस्थितांचे डोळे पाणावले.

भव्य मिरवणूक: पारंपारिक वेशभूषेत सर्व २३६ बटूंची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली.

यज्ञोपवीत धारण: विधीवत मंत्रोच्चारात बटूंनी जानवे धारण करून ब्रह्मचर्याश्रमात प्रवेश केला.

या सोहळ्याची शोभा वाढवण्यासाठी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली होती. यामध्ये उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी , माजी खासदार रवींद्र गायकवाड , आणि माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जि. प सदस्य सविता सुरेश बिराजदार, शहाजी पाटील, तुळजापूर प. स उपसभापती रोहिणी मलगिरे यांचा समावेश होता. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात गुरव समाजाच्या या उपक्रमाचे कौतुक करत, सामूहिक सोहळ्यांमुळे समाजाची एकजूट वाढते आणि सर्वसामान्यांवरील आर्थिक भार कमी होतो, असे मत व्यक्त केले.



> **आपल्या संस्कृतीतील संस्कारांची जोपासना करणे आणि पुढच्या पिढीला योग्य दिशा देणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी असे सोहळे ऊर्जा देणारे ठरतात.**
>
> **– आयोजक कमिटी, कलदेव लिंबाळा**

एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय उपस्थित असतानाही गुरव समाज कलदेव लिंबाळा व कलदेव लिंबाळा ग्रामस्थच्या आयोजक कमिटीने केलेले नियोजन वाखाणण्याजोगे होते. भोजन व्यवस्था, पार्किंग आणि विधींचे नेटके व्यवस्थापन यामुळे हा सोहळा जिल्ह्याभरात चर्चेचा विषय ठरला आहे.

## खळद येथील खुनातील आरोपी अखेर जेरबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर ::प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड :

पुरंदर ::खळद ता. पुरंदर परिसरात सापडलेल्या अनोळखी इसमाच्या मृत्यूप्रकरणी सासवड पोलिसांनी आरोपीस जेरबंद करण्यात यश मिळवले. चेतन मुगुट मांढरे (वय ३४, रा. मांढर, ता. पुरंदर) असे त्याचे नाव आहे. दीर्घकाळ तपास करूनही कोणताही ठोस धागा हाती लागत नसताना, गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी खुनाचे गूढ उकलले.

खळद येथील मोहन ढाब्याच्या शेजारील जागेत दगडांच्या ढिगाऱ्यात एक अनोळखी इसम नग्न व अर्धबेशुद्ध अवस्थेत १४ फेब्रुवारी रोजी आढळला होता. त्यास तातडीने ग्रामीण रुग्णालय सासवड येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील - उपचारासाठी ससून रुग्णालय, पुणे येथे हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान २३ फेब्रुवारी रोजी त्याचा मृत्यू झाला.




तपासात मृताची आेळख राकेश .उर्फ मिश्रीलाल छोटेलाल (वय ३३, रा. छोलामऊ, उन्नाव पुरवा, उत्तर प्रदेश) अशी पटली. शवविच्छेदन अहवालात डोक्यावरील गंभीर दुखापतीमुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ७ मार्च रोजी सासवड ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी नातेवाईक, सहकारी तसेच परिसरातील नागरिकांकडे सखोल चौकशी केली. विशेष पथक नेमून तपास करण्यात आला.

दरम्यान, हवालदार सूरज नांगरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मांढरे याचे नाव या गुन्ह्यात समोर आले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्यावर पाळत ठेवून गडहिंग्लज येथून त्याला ताब्यात घेतले, असे सासवड ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी सांगितले.